# प्रेसनोट

दि.१७/११/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.९११/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | चंदा चंद्रकांत ढवळे, वय–४५ वर्ष, वरिष्ठ सहाय्यक, वर्ग–३, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ––– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे जिल्हा परिषद शिक्षण विभागात शिक्षक आहेत. तक्रारदार यांची पत्नी मे व जुन २०२१ मध्ये कोरोना आजाराने आजारी असलेने त्यांना उपचारासाठी नगर मधील खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान त्यांचे निधन झाले. तक्रारदार यांनी पत्नीचे वैद्यकीय उपचाराचे बील स्वत: भरले व त्यानंतर सदरचे बील जिल्हा परिषद मधुन मंजुर होऊन मिळणेकरीता सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह पंचायत समिती श्रीरामपूर मार्फत जुलै २०२१ मध्ये दाखल केले. सदर बील मंजुर करणे करीता यातील आरोपी लोकसेविका चंदा चंद्रकांत ढवळे, वय–४५ वर्ष, वरिष्ठ सहाय्यक, वर्ग–३, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे रु.५०००/– लाचेची मागणी केले बाबतची तक्रार, तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली. त्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०७/११/२०२२ रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभाग येथे पंच साक्षीदारा समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेविका चंदा चंद्रकांत ढवळे यांनी तक्रारदार यांचेकडे रु.५०००/– लाचेची मागणी करुन सदर रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आज दि.१७/११/२०२२ रोजी आरोपी लोकसेविका चंदा चंद्रकांत ढवळे यांचेविरुध्द कोतवाली पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी लोकसेविका चंदा चंद्रकांत ढवळे यांना ताब्यात घेतले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

17.11

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर